# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि. रायगड-४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Website: http://jdhepanvel.org

दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र. विससं/उशि/कोविप/२०१७/807 दि. 5/4/17

प्रति,

प्राचार्य,

सर्व अधिनस्त शासकीय, अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालये

जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, व सिंधुदुर्ग

**विषयः- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत...**

संदर्भः महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र.एमआयएस-०६१६/सीआर-५१/२०१६/तीन, दि.१८.०३.२०१७

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये सर्व अधिनस्त शासकीय, अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविद्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी सोबत जोडलेले उपरोक्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करावे व यापुढे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांकरीता महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत ज्या ज्या वेळी मा. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मागणी करण्यात येईल त्या त्या वेळी महाविद्यालय उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच सोबत जोडलेल्या **प्रपत्र-१** मधील तक्त्यात आपल्या महाविद्यालयाची माहिती तात्काळ या कार्यालयास कळविण्यात यावी.

अन्यथा आपले महाविद्यालयाचे विरुध्द **उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१११९/(प्र.क्र.९/१५)/समन्वय, दि.२८.०१.२०१५ मधील क्र.२** नुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

RBhosale
5/4/17

विभागीय सहसंचालक,

उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५१/२ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्र.एमआयएस-०६१६/सीआर-५१/२०१६/तीन दिनांक : १८ मार्च, २०१७

**स्पीडपोस्टाने**

प्रति,

शिक्षण सहसंचालक(उच्च शिक्षण),
पनवेल, शासकीय अध्यापक महाविद्यालय,
मुंबई-पुणे मार्ग, पनवेल-४१०२०६.

आवक क्र 1428
दिनांक 27/3/17
सह संचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग
पनवेल जि रायगड

**विषय**:- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत

**संदर्भ**:-(१)शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:मलोआ-०११२/प्र.क्र.९५/१२/आठ, दिनांक ११ मे, २०१२.

(२)शासन परिपत्रक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्रमांक:संकीर्ण-११११/(प्र.क्र.९/१५)/ समन्वय,दिनांक २८ जानेवारी, २०१५.

(३)शिक्षण संचालक(उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, यांचे क्रमांक: मप्तअ-ब/२०१२/एमपीएससी /टे-१/प्रशा-१, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

शासन सेवेतील विविध पदावर सुयोग्य व अर्हताप्राप्त व्यक्तींची निकोप पध्दतीने निवड करण्याकरीता भारतीय संविधानातील तरतुदीनुसार लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे आयोगामार्फत वेळोवेळी विविध परीक्षांचे आयोजन केले जाते. संबंधित पद भरतीकरीता प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या लक्षात घेऊन मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शक्यतो सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी परीक्षेचे आयोजन केले जाते.

२. मुंबई येथील परीक्षांचे आयोजन आयोगाच्या कार्यालयामार्फत केले जाते. जिल्हा केंद्रावरील परीक्षांचे आयोजन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीएससी-१००८/५९०/सीएस-१०९/आठ, दिनांक १५ ऑक्टोबर, १९८२ नुसार जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले असून परीक्षा व्यवस्थित व सुरळितपणे पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची आहे. त्यानुसार परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास उमेदवारांची अंदाजित संख्या संबंधित जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या शाळा/महाविद्यालय यांना विनंती करुन परीक्षेकरीता शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याची सूचना करण्यात येते. परंतु अनेकवेळा शाळा/महाविद्यालयाकडून अजिबात प्रतिसाद दिला जात नाही. वारंवार पत्रव्यवहार करावा लागतो. अनेकवेळा त्यांच्याकडून ऐनवेळी शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देण्यास नकार दिला जातो. त्याचा परिणाम परीक्षा आयोजनावर वारंवार होत असल्याचे दिसून आले आहे. आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता अर्ज करणा-या उमेदवारांची वाढती संख्या लक्षात घेता यावर वेळीच उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे.

३. वास्तविक आयोगामार्फत आयोजित करण्यात येणा-या परीक्षा या लोकसेवेसाठी आयोजित करण्यात येतात. त्याकरीता सर्व संबंधितांकडून आयोगास सहकार्य अपेक्षित आहे. संबंधितांच्या सहकार्याशिवाय परीक्षांचे सुरळितपणे आयोजन करणे शक्य नाही. त्यामुळे आयोगाच्या गरजांनुसार वेळोवेळी परीक्षांकरीता संबंधित शाळा/महाविद्यालये उपलब्ध होणे अनिवार्य आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भिय शासन परिपत्रकांद्वारे आयोगाच्या परीक्षांच्या आयोजनासाठी शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याविषयी स्वयंस्पष्ट आदेश दिले आहेत. तसेच आयोगाच्या मागणीनुसार शाळा/महाविद्यालये तातडीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करणे बाबतही सर्व संबंधितांना शिक्षण संचालक(उच्च शिक्षण) यांच्या संदर्भिय दिनांक २२ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या पत्राद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर आदेशांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

४. संबंधित शाळा/महाविद्यालयाकडून अपेक्षित सहकार्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने आपल्या कार्यालयाकडून सर्व संबंधितांना निर्देश जारी करणे अत्यावश्यक झाले आहे. आयोगाच्या अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागणीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्यास नकार दिल्यास अथवा वेळेवर सहकार्य प्राप्त न झाल्यास संबंधित संस्था/शाळा/महाविद्यालयाविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल; असे स्पष्ट निर्देश कृपया सर्व अनुदानित/विना अनुदानित/शासन मान्यता प्राप्त शाळा/महाविद्यालयांना देण्यात यावेत. तसेच संबंधित कायद्यातील तरतुदींचा वापर करुन संबंधित संबंधित शाळा/महाविद्यालये यांचे आयोगाच्या परीक्षांसाठी अधिग्रहण करण्यात येईल, याचीही स्पष्ट सूचना संबंधितांना देण्यात यावी, अशीही विनंती आहे.

५....

४५१

५. परीक्षेकरीता उपकेंद्र निश्चित करुन घेण्याच्या कामाकरीता अधिक पाठपुराव्यासाठी आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालये/शिक्षण अधिकारी यांची नावे, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी व मोबाईल क्रमांक आयोगास कृपया तातडीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी, अशीही विनंती आहे. तसेच आयोगाच्या अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागणीनुसार त्यांच्या अधिपत्याखालील शाळा/महाविद्यालये तातडीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्याबाबतही संबंधितांना कृपया आदेश देण्यात यावेत.

६. परीक्षेस प्रवेश देण्यात येणा-या उमेदवारांची संख्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निश्चित होते. त्यानंतर, परीक्षेच्या आयोजनासाठी उपलब्ध होणारा कालावधी अत्यंत अल्प असतो. प्रत्येक परीक्षेकरीता अर्ज करणा-या उमेदवारांची संख्या निश्चित नसल्यामुळे प्रत्येक परीक्षेच्यावेळी प्रवेश देण्यात येत असलेल्या उमेदवारांची संख्या वेगवेगळी आहे. प्रत्येक जिल्हा केंद्रावरील सर्व शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची निश्चित संख्या आयोगाकडे उपलब्ध नाही.आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणा-या जाहिरातीस अनुसरुन सर्व अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत असल्यामुळे व शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची माहिती निश्चित नसल्यामुळे संगणकीय संस्करणासाठी तांत्रिक अडचणी उदभवत असल्याचे आणि त्याचा परिणाम परीक्षा आयोजनावर होत असल्याचेही निदर्शनास येत आहे. आयोगामार्फत आयोजित परीक्षांचे स्वरुप अत्यंत संवेदनशील असते व त्यामध्ये कोणत्याही टप्प्यावर त्रृटी राहिल्यास अनंत अडचणी उदभवून परीक्षा व्यवस्थित व सुरळितपणे आयोजित करण्यास मर्यादा येतात. सदर अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक जिल्हा केंद्रावरील शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची माहिती संकलित करण्याचा आयोगाने निर्णय घेतला आहे.

७. प्रत्येक जिल्हा केंद्रावरील शाळा/महाविद्यालयाच्या क्षमतेबाबतची माहिती ही केवळ संगणक संस्करणासाठी संकलित करण्यात येणार आहे. प्रचलित पध्दतीनुसार जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर आयोगाच्या कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपकेंद्र निश्चितीबाबत पत्रव्यवहार करण्यात येईल. परीक्षेच्या दिनांकास शाळा/महाविद्यालयाच्या उपलब्धतेसंदर्भात संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पत्रव्यवहार करण्यात येईल. तसेच, शाळा/महाविद्यालय यांच्याकडून प्राप्त होणा-या संमतीच्या अधीन फक्त जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त होणा-या शाळा/महाविद्यालय यादीच्या आधारेच संबंधित परीक्षेसाठी उपकेंद्र निश्चित करण्यात येतील.

८. वर नमूद केल्याप्रमाणे संगणक संस्करणासाठी आपल्या अधिपत्याखालील सर्व शाळा/महाविद्यालयांच्या क्षमतेबाबतची माहिती कृपया सोबतच्या **प्रपत्र-१** द्वारे विहित करण्यात आलेल्या नमुन्यात उपलब्ध करुन देण्यात यावी.

९. जिल्हा केंद्रावरील शाळा/महाविद्यालयाची माहिती संकलित करताना कृपया खालील बाबींचे कृपया कटाक्षाने अनुपालन करण्यात यावे:-

(१) जिल्हा मुख्यालयाच्या नजिकच्या ३० कि.मी. त्रिज्येच्या परिसरातील व वाहतुकीच्या दृष्टीने सोयीच्या अशा सर्व शासन मान्य अनुदानित/विनाअनुदानित/अभिमत/केंद्रिय शाळा/महाविद्यालयांची माहिती संकलित करावी.

(२) पारंपरिक शाळा/महाविद्यालयासोबत तांत्रिक, कृषि, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, युनानी, फार्मसी, वैद्यकीय, व्यावसायिक, पदवी, पदव्युत्तर इत्यादी स्वरुपाच्या सर्व शाळा/महाविद्यालयांची माहिती संकलित करावी.

(३) प्रत्येक बाकावर एक याप्रमाणे संबंधित शाळा/महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष किती उमेदवारांची बैठकव्यवस्था होऊ शकते, याची तपासणी करुनच माहिती देण्यात यावी.

(४) आयोगाच्या परीक्षेला बसणारे उमेदवार सर्वसाधारणपणे पदवीधर असतात, ही बाब लक्षात घेऊन उमेदवारांच्या बैठकव्यवस्थेसाठी वापरण्यात येणारी बाके व्यवस्थित आहेत काय, त्यावर परीक्षार्थी उमेदवारांना व्यवस्थित लिहिता येते काय, तसेच, ती शिशु वर्गातील विद्यार्थ्यांच्या वापरातील नाहीत; याची प्रथम खात्री करावी.

(५) संगणक संस्करणासाठी माहीती संकलित करण्यात येत असून प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी संबंधितांशी लेखी पत्रव्यवहाराद्वारे खातरजमा केल्यानंतरच परीक्षेसाठी शाळा/महाविद्यालयाची निवड करण्यात येईल, असे सुस्पष्टपणे संबंधितांना कळविण्यात यावे.

(६) शाळा/महाविद्यालयाची आयोगाच्या परीक्षेसाठी निवड झाल्यास प्रति उमेदवार रुपये ५/- याप्रमाणे सेवा शुल्क अदा करण्यात येईल; असेही संबंधितांना कृपया कळविण्यात यावे.

१०. सदर माहिती फक्त एकावेळीच संकलित करावयाची असून त्याच्या आधारे आयोगामार्फत आयोजित परीक्षांचे काम सुलभ होणार आहे.

११. नजिकच्या काळामध्ये आयोगामार्फत आयोजित परीक्षांचा भरगच्च कार्यक्रम लक्षात घेऊन प्रस्तुत प्रकरणी प्राथम्याने कार्यवाही करुन आवश्यक माहिती सोबतच्या विहित प्रपत्राद्वारे **दिनांक ३० एप्रिल, २०१७** पर्यंत उपलब्ध करुन देण्याची कृपया व्यवस्था करावी, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू,

(सु.ह. अवताडे)
अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

प्रपत्र — १

| Sr. No. (1) | Name, Full address and Tel. No. of the school/college (2) | Floor (3) | No. of Class Rooms (4) | No. of Benches in each Class Room (5) | No. of Candidates accommodated [Per Bench Per Candidate] (6) |
|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | |
| 2. | | | | | |
| 3. | | | | | |
| 4. | | | | | |
| 5. | | | | | |
| 6. | | | | | |

Dated :-

Signature of Authorized Signatory with Seal

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे आयोजित परीक्षांकरिता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

शासन परिपत्रक क्रमांक मलोआ-१०१२/प्र.क्र. ९५/१२/आठ,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ मे २०१२.

**संदर्भ**---महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्रमांक ८६(१)/२०१२/तीन, दिनांक २७ एप्रिल २०१२

**शासन परिपत्रक :**

शासन सेवेतील विविध पदांवर सुयोग्य व अर्हताप्राप्त व्यक्तींची निकोप पद्धतीने निवड करण्याकरिता भारतीय संविधानातील तरतूदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी परीक्षांचे आयोजन केले जाते. भरतीकरिता प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या विचारात घेऊन मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शक्यतो सुट्टीच्या दिवशी परीक्षांचे आयोजन केले जाते. उमेदवारांच्या अंदाजित संख्येनुसार जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना कळविले जाते. जिल्हाधिकारी कार्यालयाला बहुतांशी शाळा/महाविद्यालयाकडून अजिबात प्रतिसाद दिला जात नाही. वारंवार त्यांच्याशी पत्रव्यवहार करावा लागतो आणि अनेकवेळा त्यांच्याकडून ऐनवेळी शाळा/महाविद्यालय उपलब्ध करून देण्यास नकार दिला जातो. परिणामी शाळा/महाविद्यालयांच्या असहकाराचा विपरित परिणाम आयोगाच्या परीक्षा आयोजनावर होत असतो.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षा ह्या लोकसेवेसाठी आयोजित केल्या जातात. त्यामुळे या परीक्षांच्या आयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करून अथवा अन्य अधिनियमातील तरतुदींचा वापर करून त्यांच्या जिल्ह्यातील संबंधित शाळा/महाविद्यालये परीक्षांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही कृपया करावी.

३. तसेच, आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून द्यावीत अन्यथा त्यांच्याविरूद्ध कार्यवाही करण्यात येईल असे निदेश/सूचना शालेय शिक्षण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी संबंधितांना संचालक, शिक्षण/तंत्र शिक्षण/ उच्च शिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण यांच्यामार्फत कृपया द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरित

**श्री. प्र. पाटील,**

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

(शा. म. मु.) एचए २३६२ (२०,०००—१२—२०१५)

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरिता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत.**

महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-११११/(प्र.क्र.९/१५) समन्वय

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

दिनांक २८ जानेवारी २०१५

वाचा.—

(१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक मलोआ-१०१२/प्र.क्र.९५/१२/आठ, दिनांक ११ मे २०१२.

(२) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र (१) क्रमांक ८६(१)/२०१२/तीन, दिनांक ९ जुलै २०१४ व (२) क्रमांक ८६(१)/२०१५/तीन, दिनांक ३ डिसेंबर २०१४.

**शासन परिपत्रक :**

महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी परीक्षांचे आयोजन केले जाते. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत मागणी केली जाते व बहुतांशी शाळा/महाविद्यालयांकडून नकार दिला जातो. परिणामी शाळा/महाविद्यालयांच्या असहकाराचा विपरित परिणाम आयोगाच्या परीक्षा आयोजनावर होत असतो. ही बाब विचारात घेऊन आयोगाच्या परिक्षांकरिता मागणीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून द्यावीत अन्यथा त्यांचेविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल असे निदेश/सूचना संबंधितांना संचालक, शिक्षण/तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण यांच्यामार्फत कृपया द्याव्यात, अशा सूचना संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून द्यावीत अन्यथा त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल असे निदेश/सूचना संचालक, तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी सर्व संबंधितांना द्यावेत. तसेच संचालक, तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून न देणाऱ्या संस्थांविरूद्ध कार्यवाही करण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१५०१२८१७२३१४६२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरित

**(का. रा. पिळणकर)**

कार्यासन अधिकारी.

प्रत

१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, कुपरेज, मुंबई २१.
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. संचालक, प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. सामान्य प्रशासन विभाग (का-८), मंत्रालय, मुंबई.
७. सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. निवड नस्ती (समन्वय).

(शा. म. मु.) एचए २३६३ (२०,०००—१२—२०१५)